# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

---

**प्रेसनोट** **दिनांक २२/०८/२०२४**

रेंटोला इंडिया कंपनीचे डायरेक्टर ऑफीस पत्ता – व्हिजन वन मॉल, भूमकर चौक, ऑफीस नंबर ४२३, ४२४, ४०१, ४०२ चौथा माळा, मुंबई पुणे हायवेलगत, वाकड, पुणे. चे संचालक व भागीदार १)संदीपकुमार लाल बहादुर, रा. प्लॉट नं ८०५, बी विंग, सप्तगिरी अपार्टमेंट, बाणेर, पुणे मूळ राहणार नरईपुर, पोस्ट रगडीह, आझमगढ, उत्तर प्रदेश, २) सीमा मित्तल, रा. सुशीलकुमार हाऊस नं. ५६७ मिठन मोहल्ला कलंदरीगेट करनाल रूरल पार्ट १ करनाल हरियाणा यांनी दिनांक १३/०६/२०२३ रोजी पासुनचे कालावधीमध्ये रेंटोला इंडिया कंपनीचे नावाने गुंतवणूकदारांना आकर्षक गुंतवणूक योजना व त्यावर आकर्षक परतावा देण्याची योजना जाहिर केली. भाडे तत्वावर घेतलेली ई- ॲटोरिक्षा पेटीएम मॉल, फ्लिपकार्ट, ॲमेझॉन, झोमॅटो, स्विगी, झेप्टो, लाईमरोड, बीग बास्केट इ. कंपन्यानमध्ये भाडेतत्त्वावर लावुन दरमहा ३१,०००/-रू भाडे कमवा व सोन्याचे व चांदीचे नाणे बुकिंग करतेवेळी मिळवा अशी जाहिरात प्रसिद्ध केली. व त्याबाबत आरोपींनी कंपनीचे ब्रोशर मध्ये त्यांची “आवर डिलिव्हरी पार्टनर्स” या नावाने जाहिरात केली आहे व असोसिएटस् ब्रॅन्ड पार्टनरस् म्हणुन पॅजियो, महिंद्रा बजाज व इतर कंपन्यांची जाहिरात केली आहे व ब्रोशर मध्ये रेंटोला फ्रॅंचाईजी फी मॉडयुल-१,२,३ रुपये १) ४,७५,०००/- २) ६,७५,०००/- ३)१२,७५,०००/- व १५,७५,०००/- रुपये अशी फ्रॅचाईजी योजना तयार केली. तसेच आरोपीने कंपनीचे ऑफिस अहमदनगर, तसेच वाशी, मुंबई येथे देखील सुरू करून त्याठिकाणी देखील नागरिकांची फसवणूक केली आहे. तसेच गुंतवणूकदारांना ॲटो ई-रिक्षा करीता १,११,०००/-रू ॲटो ई-रिक्षामध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडले. व काही गुंतवणूकदारांकडुन रोख रक्कम गुंतविल्यास त्यावर परतावा देण्याकरीता रक्कम स्विकारली आहे. तसेच त्यांच्याकडुन भाडेतत्त्वावर घेतलेल्या रिक्षा कोणतेही कंपनीस भाडेतत्त्वावर न देता त्यातील काही रिक्षा कंपनीचे शोरूममध्ये डेमो रिक्षा म्हणून ठेवल्या व काही रिक्षा या थेरगाव येथील पार्किंग जागेत बेवारसरित्या पार्क करून ठेवल्या. आरोपीने सुमारे ७३२ गुंतवणूकदार यांचेकडुन कंपनीचे गुंतवणूक योजनेकरीता सुमारे ७ कोटी रुपये रक्कम विविध मार्गानी स्विकारली आहे. कंपनी अचानकपणे बंद करून त्याबाबत गुंतवणूकदारांना कोणतीही पुर्व सुचना न देता आरोपी हे राहते घर व कंपनीचे कार्यालय बंद करून सन २०२३ मध्ये पसार झाले. त्यानंतर आरोपींचा शोध घेवुन आर्थिक गुन्हे शाखा येथील पोलीस पथकाने सापळा रचुन **दि. १७/०८/२०२४ रोजी दाखल गुन्हयाचे कामी सेक्टर ११३ पो.स्टे. नोएडा, उत्तरप्रदेश येथुन अटक केली आहे.** आरोपी दिनांक २३/०९/२०२४ रोजीपावेतो पोलीस रिमांड मध्ये असुन त्यांचा तपास सुरू आहे. तसेच गुंतवणूकदारांनी कंपनीस भाडेतत्त्वावर दिलेल्या ६१ ई रिक्षा पैकी ३७ मा. न्यायालयाचे आदेशान्वये रिक्षा मालकांचे ताब्यामध्ये परत दिल्या आहेत. व पुढील रिक्षा देण्याची कार्यवाही सुरू आहे. याबाबत वाकड पोलीस ठाणे ११५५/२०२३, भा.द.वि.कलम ४२०, ४०६, ४०९, १२०(ब),३४, सह महाराष्ट्र ठेवीदारांचा हितासंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, ४ अन्वये गुन्हा दिनांक ०१/१२/२०२३ रोजी दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड हे करीत आहेत. सदर प्रकरणी जाहीर आवाहन करण्यात येते की पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत रेटोंला इंडिया कंपनी , मार्फत फसवणुक झाली असल्यास आर्थिक गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड येथे संपर्क साधावा.

सदरची कारवाई मा.विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.शशिकांत महावरकर, सह पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखली व.पो.नि मुधकर सावंत, पो.नि वनिता धुमाळ, पोउनि समीर दाभाडे, पोउनि संदिप इंगळे , पोउनि कृष्णहरी सपकळ, सपोफौ संजय पवार, पोहवा ब.नं ७९९ रावते, मपोहवा ब.नं १६१६ कोमल नाईकरे, पोशि ब.नं १६५२ भास्कर दिघे, पोशि ब.नं ३५४४ आकाश पारधी यांनी केली.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड